# जाती निर्मूलन संस्था : मराठवाडा वृत्त

## शिरूभाऊ लिमये

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावरून वातावरण अतिशय गढूळ व गंभीर झाले आहे. दलित व सवर्ण यांच्यांत मोठी दरी निर्माण झाली आहे. सर्व देशातच या दोन समाजघटकांत मन-मिटाव नाही. मराठवाड्यात ही कटुता कमी न होता उलट वाढतच आहे असे दिसते.

नामांतराच्या प्रश्नावरून तेथे दंगली झाल्या, दलितांच्या झोपड्या-घरे जाळली गेली. दलितांना मारपीट झाली. गावेच्या गावे सोडून त्यांना आश्रयार्थ अन्यत्र जावे लागले. त्या जातीय दंगली उपेक्षणीय नव्हत्या. म्हणून जातिनिर्मूलन संस्थेने जास्तीत जास्त दंगली झाल्या होत्या तेथे कार्यकर्ते पाठवून प्राथमिक पाहणी केली. दूरदृष्टीने काही काम तेथे होणे आवश्यक असल्याचा निष्कर्ष या पाहणीतून निघाला. सकाळकारांनी दंगलग्रस्तांचे पुनर्वसन व्हावे, गरिबांची पडलेली, जाळलेली घरे पुन: उभारून द्यावीत म्हणून जनतेला मदतीचे आवाहन केले होते. त्यासाठी एक निधी उभारला होता. त्याला प्रतिसाद निराशाजनक मिळावा याचे आश्चर्य सकाळकारांना वाटू लागले. असे का व्हावे याचा शोध घेता त्यांना आढळून आले की बेघर झालेल्यांना मानवतेच्या दृष्टिकोनातून मदत करून घरे बांधून दिली तरी ती पुन्हा जाळली जाणार नाहीत यांची शाश्वती काय ? ही शंका मदतनिसांच्या मदतीचा हात मागे खेचीत आहे. देणगीदारांची ही व्यथा लक्षात घेऊन, सकाळकारांनी मिळालेले १०–१५ हजार रुपये भांडीकुंडी व कापड-चोपड खरेदी करून दंगलग्रस्तांना वाटून टाकावे व खाते बंद करून टाकावे असा निर्णय घेण्याचे ठरविले परंतु जातिनिर्मूलन संस्थेने अशा तऱ्हेने पैसे खर्च करण्याऐवजी बांधलेल्या झोपड्या पुन्हा जाळल्याजाणार नाहीत, असे समंजसपणाचे वातावरण निर्माण करण्याचा यत्न करण्यासाठी ती रक्कम जा. नि. संस्थेस द्यावी ही विनंती केली. सकाळकारांनी ती मान्य करून १५।२० हजार रुपये गेल्या तीन वर्षांत दिले.

नामांतर होवो वा न होवो, त्यासाठी गरिबांना मारपीट होता कामा नये, बेघर होण्याची त्यांचेवर वेळ येता कामा नये. यासाठी सवर्णांचेच प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. तसेच मराठवाड्यात नामांतर विरोधी तो दलित विरोधी– आंबेडकर विरोधी असे समीकरणच जणू होऊन बसले आहे; तेही दूर केले पाहिजे. परिवर्तनाची कोणतीही बाब असो. सवर्णांच्या वा दलितांच्या लोकसंख्येपैकी किमान २५ टक्के लोक तरी तिच्या मागणीशी मनापासून सहमत असले पाहिजेत. सर्वच दलित ' सवर्ण–विरोधी ' आहेत; अथवा २५ टक्केही सवर्ण मनापासून दलितप्रेमी अथवा आंबेडकरनिष्ठ नाहीत असं मानणे योग्य नव्हे, या भूमिकेवर जातिनिर्मूलन संस्थेने मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्याच्या १५–२० खेड्यांत काम चालविले आहे. त्यासाठी निर्भंगी संडास बांधणे; बालवाड्या व प्रौढवर्ग चालविणे; ग्रामोद्योगाचे शिक्षणाबाबत तरुणांना मार्गदर्शन करणे; तरुण मंडळे चालविणे इ. बहुविध मार्गांनी काम चालविले आहे. सुमारे ४० हजार रुपयांची एक योजना आखून जसजसे आर्थिक सहाय्य उपलब्ध होईल तसतसे योजनेतील कार्यक्रम हाती घेतले जात आहेत. जानेवारीत नायगाव येथे वरील वीस गावांतील कार्यकर्त्यांचे एक शिबिर स्व. नरहर कुरुंदकर यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. जूनच्या १८, १९ व २० तारखांना बरबडा या गावी एक खेडुत महिलांचे शिबिर अर्थ–विज्ञान वर्धिनीच्या आर्थिक सहाय्याने घेण्यात आले. या महिला शिबिराचा अहवाल खाली देत आहे.

## महिला शिबिर बरबडा

### सौ. शारदा तुंगार

मराठवाड्याचा उन्हाळा, त्यातून मे महिन्याचे रणरणते ऊन. बरबडा या खेड्यात होणारे हे पहिलेच शिबिर. त्यातून महिलांचे शिबिर. निजामी राजवटीमुळे अजून इथे पडदा पद्धती आहे. बाई घराबाहेर जाते ते नवलच. त्यातून एखादी मुलगी शिकली– नोकरीला लागली, तर लग्न जुळण्याच्या वेळी या नोकरी करणाऱ्या मुलीला कोण पत्करणार ? नोकरी सोडावी लागते. बहुतेक सगळी अविभक्त कुटुंबे. सासू, सासरे, नवरोजी या साऱ्यांची परवानगी मिळाली तर बाई तीन दिवसांच्या शिबिरासाठी येणार. गीताबाईंनी महिनाभर घरोघर फिरून १५०–२०० महिला गोळा केल्या.

१८-१९-२० जून ८२ शिबिराच्या तारखा ठरल्या. भारतीय अर्थ विज्ञान वर्धिनी व जातिनिर्मूलन संस्थेच्या वतीने नांदेडपासून बरेच आत, आंध्र प्रदेशाच्या सरहद्दीवर असलेल्या बरबडा येथे हे शिबिर घेण्याचे ठरले. शिरूभाऊ लिमये या शिबिरास हजर राहणार होते. शिबिराची जबाबदारी प्रा. डॉ. ताराबाई परांजपे यांच्यावर होती. बरबड्याचे सरपंच बळवंतराव धर्माधिकारी बाईंचे विद्यार्थी. तेव्हा घरचेच कार्य समजून सरपंच व त्यांचे सारे कुटुंबीय कामाला लागले. शिबिराचे उद्घाटन नांदेडचे शिक्षणाधिकारी श्री. केळकरांच्या हस्ते झाले. खेड्यापाड्यातून जमलेल्या बायका कुतूहलाने पाहत होत्या. आजही मराठवाड्यात गृहिणी बैठकीत येत नाही. पुरुषांच्या समोर जात नाही, कधी बोलावं लागलंच तर डोक्यावर पदर घेऊन दारामागे उभी राहून एखादं वाक्य बोलते. अन्यथा मुकाट्याने राबत राहायचं, एवढंच तिला माहीत. अशा सगळ्या मंडपात माणसासमोर येऊन बसल्या होत्या. परस्पर परिचयाचा कार्यक्रम सुरू झाला. तेव्हा माणसं समोर म्हणून त्यांना आपलं नावसुद्धा सांगता येईना. नाव विचारलं की पदरात तोंड लपवायचं अन् 'ई बया लाज वाटते !' म्हणायचं. सगळी मंडळी निघून गेल्यावर मग कुठे त्यांना कंठ फुटला अन् आम्हाला त्यांची नावं कळली.

' स्त्रिया आणि जातिनिर्मूलन ' या विषयावर बोलताना शिरूभाऊंनी जातीयतेची भावना नष्ट होणं किती आवश्यक आहे अन स्त्रियाच

हे काम करू शकतात. असं अतिशय सोप्या भाषेत अनेक उदाहरणांनी पटवून दिलं.

विलास वाघ यांनी स्त्री-जीवनाच्या संदर्भात प्रौढ शिक्षणाचे महत्त्व पटवलं.

दुपारी सौ. शैलाताई कोनलाडे यांनी भारतीय अर्थ विज्ञान वर्धिनीच्या कामाची माहिती दिली. सुरवातीला पुण्याची बाई म्हणून बायका त्यांच्याशी बोलायला घाबरल्या. पण त्या सर्वांमध्ये इतक्या आपलेपणाने मिसळल्या की, मग सतत त्यांच्याभोवती गराडा पडू लागला.

संध्याकाळी सुशीलाबाई रातोळे यांचे स्त्रियांच्या राजकारणातील सहभागावर व्याख्यान झाले. सुशीलाबाई समाजकल्याण खात्याच्या सल्लागार मंडळाच्या सदस्या. आपल्या समाजाची एक बाई माईक समोर उभी राहाते, धीटपणाने बोलते हे पाहून शिबिरातल्या बायकांना मनांत कुठे तरी प्रेरणा मिळत होती. आपल्याच मायबोलीत त्यांना अनुभव ऐकायला मिळत होते. शिबिरात त्यांचे मन रमू लागले होते. पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमानंतर काही महिलांना घरच्या परवानगी अभावी घरी जावं लागलं. पण शिबिराचं त्यांना इतकं आकर्षण वाटू लागलं होतं की दुसऱ्या दिवशी कुष्णुर, सुगाव, इथून बरवड्यात येण्यासाठी त्यांना बस मिळाली नाही तरी तान्हे मूल घेऊन पायी त्या शिबिरात सहभागी झाल्या.

दुसऱ्या दिवशीच्या प्रातःसत्रात सौ. शारदा तुगार यांचे ‘ पुरुषप्रधान समाज रचनेतील स्त्रीचे स्थान ’ या विषयावर व्याख्यान झाले. जन्मभर स्त्रीचे स्थान दुय्यम. आजही मराठवाड्याकडे आठ–आठ लग्ने करणारे शिवाजीचे वारसदार आहेत. मुलांच्या समोर सासूचा मार खाणाऱ्या ४०–४५ वर्षांच्या सुना आजही मराठवाड्यात आहेत. सासुरवासाचे प्रकार तरी किती? शहर कुठे, अन् साध्या माणुसकीला पारखी असलेली आमची ग्रामीण स्त्री कुठे? प्रत्यक्ष खेड्यात जाऊन पाहिल्याशिवाय नाही कळायच

‘ ग्रामीण महिलांच्या समस्या ’ यावर बोलताना सौ. मंदा धर्मापुरीकर यांनी सर्वच समस्यांचा उहापोह केला. स्त्री शिक्षणाची जरूर सांगून त्यांनी त्याबाबत किती हेळसांड होते हे सोदाहरण सांगितले. नोकरीसाठी शिक्षण हा समज डोक्यातून काढून टाका आपल्यावर जी बालसंगोपनाची संस्काराची जबाबदारी आहे तीच अधिक चांगल्या रीतीने पार पाडण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी ताराबाई परांजपे ‘ मराठवाड्याच्या लोकसाहित्यातील स्त्रीजीवन ’ यावर बोलल्या. ‘ बाई लेकीच्या जनमा नको घालू श्रीहरी, पुरुषाची ताबेदारी जलमभरी ’ ह्यापासून सुरवात करीत बाईंनी ओव्या, उखाणे, म्हणी यांची पेरणी करीत स्त्रीजीवन साकार केले. बायकांना माहीत असलेली गीतं म्हणी, उखाणे अर्थांची फोड करून त्यांच्या पुढे येत होते त्यांच्या माना डोलत होत्या. त्यांचेच अनुभव जणू शब्द रूपाने मांडले जात होते.

सायंकाळी अॅड् संघमित्रा मांजरमंकर ‘ कायद्यातील स्त्रीजीवनविषयक तरतुदी ’ वर बोलल्या. खेड्यातल्या बायकांनी स्त्रीला शिक्षिका, नर्स म्हणून पाहिलेली, पण कोर्टात वकील म्हणून स्त्री दिसणे हे अपरूपच ! वकील बाई दिसते कशी? बोलते कशी? विवाह विषयक कायदे, दत्तक विधान, मतदानाचा हक्क, आदीविषयी बाई बोलल्या. तीन दिवसांच्या या शिबिरात सारे स्त्रीजीवन चर्चिले गेले. वक्त्या मराठवाड्यातल्या. त्यामुळे बोलीभाषेतून विचार मांडत होत्या. शिबिरार्थीजवळ विचारांची शिदोरी जमली होती. पहिल्या दिवशीचा संकोच गळून पडला होता. त्या पण बोलू लागल्या होत्या. संध्याकाळी त्यांनी पारंपारिक गीते म्हटली. साऱ्याजणी माहेरपणाला आल्यासारख्या सुखावल्या होत्या. तिसऱ्या दिवशी सौ. रत्नप्रभा घोन्सीकरांचं ‘ महिला आणि अंधश्रद्धा ’ यावर व्याख्यान झालं सौ सुनिता सहस्रबुद्धे यांचे मिळवत्या स्त्रीच्या समस्यांवर व्याख्यान झालं. खेड्यात मोलमजुरी करणाऱ्या स्त्रियाच्या अडचणीवर त्या बोलल्या. श्रोत्यांतल्या काही बायका रोज मजुरी करून जगणाऱ्या काम सोडून त्या शिबिरात सहभागी झाल्या होत्या. आयुष्यात त्यांनी कधी शंभर रुपये एकावेळी पाहिले नव्हते सारं कुटुंब मजुरीसाठी बाहेर पडलं तर संध्याकाळी ओली-सुकी भाकरी मिळत होती. सारे जिव्हाळ्याचे प्रश्न चर्चिले गेले

प्राचार्य डॉ. ना. अ जोशी समारोपासाठी आले होते. प्रा. कुलंदकरांचे भावस्मरण करून त्यांनी स्त्री जीवनातील प्रश्नांचा आढावा घेतला. शेवटी शिरूभाऊ लिमये बोलायला उभे राहिले. ते म्हणाले, आपण आज पासून १० गोष्टी बंद करायच्या. नवऱ्याचा मार बंद, पडदा पद्धती बंद, हुंडा पद्धती बंद आदी. पहिल्यादिवशी स्वतःचे नाव सांगण्यासाठी सुद्धा तोंड न उघडणाऱ्या बायका शिरूभाऊंच्या घोषणांना आवेशाने ‘ बंद ’ ला प्रतिसाद देत होत्या.

शिबिराची सांगता झाली बरवडेकरांचा पाहुणचार घेऊन माहेरपण भोगून आम्ही साऱ्या जणी निघाल्या होतो पाय निघत नव्हता. मन मागे रेंगाळत होत गावकरी मंडळींचा आग्रह चालला होता. पुन्हा आमच्या गावात असं शिबिर घ्या बायका विचारीत होत्या–पुन्हा केव्हा येणार बाई ? ’

◎ ◎


□ परंपरा आणि परिवर्तन

ले. जे कृष्णमूर्ति ( खंड १ ला ) २०–००

□ परंपरा आणि परिवर्तन

ले. जे कृष्णमूर्ति ( खंड २ रा ) २०–००

□ जीवनभाष्ये

ले जे. कृष्णमूर्ति ( खंड ३ रा ) ४०–००

प्राप्तिस्थान : साधना प्रकाशन

४३०–३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०

( फोन नं. ४७०६८६ )

□ ‘ ज्ञानापासून मुक्ति ’

ले जे. कृष्णमूर्ति १२–५०

एक ऑगस्टला प्रसिद्ध होणार